# सेनापती संताजी घोरपडे आणि छ. राजाराम महाराज संबंध : एक अभ्यास

**बुद्रुक साईनाथ बळीराम**
संशोधक विद्यार्थी
sainath7858@gmail.com
मो : 7709107858

**प्रस्तावना**

संताजी घोरपडे यांची कामगिरी छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, महाराणी येसूबाई आणि छत्रपती राजाराम महाराज यांच्या कार्यकाळात पार पडली आहे. असे असले तरी याठिकाणी छत्रपती राजाराम महाराज यांच्या कार्यकाळातील सहसंबंध आणि कार्याचा अभ्यास प्रस्तुत संशोधन लेखामध्ये करण्यात आला आहे. स्वराज्याची सूत्रे महाराणी येसूबाई यांच्याकडे आल्यानंतर त्यांनी आणि शाहू यांनी रायगडावर राहून किल्ला लढवावा, स्वराज्याची संपूर्ण जबाबदारी राजारामाने सांभाळावी, मोगलांशी लढा देऊन स्वराज्यात फिरत राहावे. जर स्वराज्यात त्यांचा निभाव लागला नाही तर कर्नाटकात जिंजीस जावे. त्यामुळे मोगलांशी लढा सुरु ठेवता येणार होता व मोगल शक्ती विभागल्या जाणार होती." याबाबत डॉ. जयसिंगराव पवार म्हणतात, "ही योजना म्हणजे येसूबाई, राजाराम, प्रल्हाद निराजी, रामचंद्रपंत, संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांनी उभारलेली राजकीय व लष्करी आघाडी होती. या योजनेत सर्वजण संकटावर मात करण्याच्या हेतूने एकत्र आले होते. १२ मे १६९३ पर्यंत संताजी घोरपडे सेनापती पदावर होते. या काळात संताजी-धनाजीने एकत्रपणे मोहिमा राबविल्या. त्यावरुन सेनापती पदाबाबत दोघांमध्ये तरी कसलेच मतभेद नव्हते. तसे असते तर ते एकत्ररित्या मोहिमांमधून वावरताना दिसले नसते. त्यांचे कार्यक्षेत्र भिन्न भिन्न राहिले असते. असे असूनही अनेक इतिहासकारांनी त्यांच्यात वैर होते, जुना वाद होता अशी वक्तव्ये केली आहेत. परंतु यामध्ये कोणतेही तथ्य असल्याचे दिसून येते नाही. याठिकाणी सेनापती संताजी घोरपडे व छत्रपती राजाराम महाराजांच्या संबंधाचा अभ्यास खालीलप्रमाणे करण्यात आला आहे.

**अभ्यासाची उद्दिष्टे**

१. सेनापती संताजी घोरपडे व राजाराम महाराजांच्या संबंधाचा अभ्यास करणे.
२. सेनापती संताजी घोरपडे व राजाराम महाराजांच्या संबंधातील ताण-तणावाचा अभ्यास करणे.

**सेनापती संताजी घोरपडे व छत्रपती राजाराम महाराज यांचे संबंध**

सेनापती संताजी घोरपडे व छत्रपती राजाराम महाराज यांच्या सहसंबंधाचा अभ्यास खालील विविध मुद्यांच्या आधारे घेण्यात आला आहे.

**१. कारभाराची विभागणी**

रायगड वेढा पडल्यानंतर राजारामाने बाहेर पडून स्वराज्यातील किल्यावर आश्रय घेऊन मोगलांशी लढण्याचा प्रयत्न केला. पण ते जिथे जातील तिथे मोगलांनी त्यांचा पाठलाग सुरुच ठेवल्याने

राजरामाचा स्वराज्यात निभाव लागणे कठीण झाले. शेवटी कर्त्या मंडळीच्या सल्याने स्वराज्य सोडून कर्नाटकात जिंजीस जाण्याचा छत्रपती राजारामाने निर्णय घेऊन २६ सप्टेंबर १६८९ रोजी पन्हाळा सोडला. प्रयाणापूर्वी त्यांनी स्वराज्याची संपूर्ण जबाबदारी रामचंद्रपंतावर सोपवून त्यांच्या हाताखाली शंकराजीपंत नारायण, संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांना मदतीस दिले.

**२. सेनापती पदावर संताजीची नियुक्ती**

संताजी-धनाजी दोघेही पंचसहस्त्री पदावर होते असे पत्र 13 एप्रिल 1690 चे राजाराम महाराजांचे पहावयास मिळते. दोघेही पराक्रमाच्या बाबतीत समान होते. दोघांचाही छत्रपती घराण्याशी जवळचा संबंध होता. तर संताजीच्या बाजूने अधिक जमेची बाब म्हणजे त्याचे वडिल सेनापती म्हालोजी घोरपडे छत्रपती संभाजी महाराजांच्या काळात मोगलांशी झालेल्या चकमकीत मारल्या गेले. म्हणजे वंशपरंपरेने सेनापतीपद संताजीकडेच जाणार होते. अशा प्रसंगी रामचंद्रपंताने आपल्या "हुकूमत पनाह" या अधिकाराचा वापर करुन छत्रपतीला तो मानन्यास लावून सेनापतीपदी संताजीची शिफारस केली. छ. शिवरायांच्या परंपरेस तो साजेसा निर्णय होता. पण चिटणीस आपल्या बखरीत राजारामाचे वाक्य देतो की, "आमचे मनात धनसिंग जाधवराव यास हे पद द्यावे असे होते, तुमची मर्जी यास देण्याची, तरी देतो." याचा अर्थ असा की हा सर्व भाग चिटणीसाने रचला असून तो सर्वथा संताजीचा राजारामाशी वेळोवेळी होणाऱ्या बेबनावावर आधारीत आहे. ते राजारामाचे नव्हे तर चिटणीसाचे कारस्थान असावे. कारण राजाराम महाराज संताजीच्या कार्याबाबत मिरजेची देशमुखी वंशपरंपरागत देतात. राजाराम बखरीत चिटणीस संताजीच्या चांगल्या कार्याची नोंदी देतो." तसेच राजरामाने आपल्या कारकिर्दीत कोणावरही अन्याय केलेला दिसत नाही.

जिंजी परिसरात मोगलांचा जोर वाढू लागला म्हणून संताजी-धनाजीची गरज छत्रपतीस जास्तच वाटू लागली. दोघांची संयुक्त मोहिमच जिंजी वाचवू शकेल अशी अशा छत्रपती राजारामास होती. म्हणून महाराजांनी संताजी व धनाजी यांना कर्नाटकात जाण्यास तयार केले. कारण दोघात नाराजी नव्हतीच. संताजी रुसला होता तो छत्रपतीवर, धनाजीवर. धनाजी छत्रपतीचा आदेश मानीत होता म्हणून तो सेनापती बनला. संताजी घोरपडे शब्दाबाहेर होता म्हणून तो बडतर्फ झाले होते. धनाजी जाधव सहजासहजी सेनापतीपद सोडणार नाही असा समज संताजीचा होता, तसाच विचार छत्रपतीचाही होता. म्हणून छत्रपतीने विठ्ठल निलकंठ व परशुराम यांच्या मध्यस्तीने फेब्रुवारी १६९४ मध्ये संताजीची दुसऱ्यांदा सेनापती पदावर नेमणूक करून त्यांच्यातील असंतोष दूर केला.

**३. सेनापती पदावरुन बडतर्फी**

इ.स. १६९२ व १६९३ मध्ये मराठ्यांनी जिंजीसमोर मोगलांची मोठी कठीण अवस्था करुन सोडली होती. असे असतानाही राजारामाने मोगलांना वाँदीवॉश पर्यंत माघार घेऊ दिली याबाबत संताजी नाराज होता. त्याने छत्रपतीस सल्ला देऊन मोगल सेनानींना व राजपुत्रास कैद करण्याचा आग्रह धरला. पण राजारामाने ते मनावर घेतले नाही. परिणामी संताजी घोरपडे रुसला. त्याचा रुसवा काढावा व तंजावरच्या शहाजी भोसलेस भेटावे म्हणून राजारामाने त्रिचन्नापलीची मोहिम मार्च १६९३ मध्ये हाती

घेतली. त्यानंरही संताजी रुसूनच होता. अशातच बहिर्जीने बंडखोरी केली. परिणामी मे १६९३ मध्ये राजारामाने प्रथम संताजीस सेनापती पदावरुन कमी करुन त्या जागी धनाजी जाधवास नेमले.

मार्च 1693 मध्ये विठ्ठल निलंकठ व परशुराम त्रिंबकने संताजीची समजूत काढली. शंकराजी नारायणने ऑक्टोबर 1694 मध्ये हितोपदेश करुन इमाने इतबारे सेवा करण्याचे कबुल करुन घेतले. असे असले तरी शंकराजी नारायण व रामचंद्रपंताने वतनविषयक जे धोरण स्वीकारले व त्यातून सुभानजी नागोजी माने याबाबत छत्रपतीचाही आदेश संताजीने मानला नाही. त्यावरुन वाद विकोपास जाऊन पुन्हा राजाराम-संताजी यांच्यात दुरावा निर्माण झाला. जून १६९६ मध्ये संताजीस सेनापतीपदावरुन कमी केले.

**राजाराम-संताजी वितुष्टाची कारणे**

छत्रपती राजाराम व संताजी घोरपडे यांच्यातील संबंधामध्ये वितुष्ट असणाऱ्या कारणांचा आढावा खालीलप्रमाणे घेण्यात आला आहे.

**१. परिस्थितीच्या जाणिवेतील फरक**

राजारामकालीन संघर्षमय परिस्थिती पाहाता त्यांनी औरंगजेबाच्या वतने व इनामे देण्याच्या धोरणाला शह देण्यासाठी तशीच वतने व इनामे देण्याचे धोरण स्वीकारले. छ. शिवरायांच्या तत्वांना त्यांना तिलांजली द्यावी लागली. अनेकांना मोगलांकडून स्वराज्यकार्यास कामी लावले. ते करताना वतने ही द्यावीच लागली. परतलेल्या मराठा सरदारांना सन्मानाने वागविले. ती तत्कालिन परिस्थितीची गरज होती. राजारामाच्या वतनविषयक धोरपणाबाबत नाराज असणा-या संताजी घोरपडे मात्र महादजी जगदाळेस त्याचे वतन मिळावे असा आग्रह धरतो. तेच धनाजीनेही केले होते."

**२. सुभानजी माने प्रकरण**

मराठे सरदारांना हाताशी धरुन औरंगजेबाने जो लष्करी धुमाकूळ मराठी राज्यात मांडला होता त्याला पायबंद घालून प्रतिशह देण्यासाठी मराठी सरदारांना भरपूर वतने व इनाम देऊन आपल्याकडे आणण्याचे धोरण राजारामाने अवलंबिले. त्यांच्या धोरणामुळे औरंगजेबास सोडून नेमाजी शिंदे, माणकोजी पांढरे, नागोजी माने, हणमंतराव घोरपडे, हणमंतराव निंबाळकर इ. मराठे सरदार स्वराज्यात आले. सुभानजी माने हा नागोजीचा मुलगा पित्यासोबत मोगलांकडून स्वराज्यात आला. राजारामाने त्यास संताजीच्या हाताखाली देऊन काम करुन घेण्याचे सुचविले. पण मोगलांकडून परतलेल्यांबाबत संताजीस आत्मियता दिसत नाही. सुभानजी माने याची संताजीस आत्मियता दिसत नाही. सुभानजी माने याची संताजी घोरपडे यांनी "कित्येक उपेक्षेच्या गोष्टी बोलून पाने पाठवून देऊन मनात येईल तिकडे जाणे" म्हणून सांगोन पाठविले. तेव्हा 12 जुलै 1695 च्या पत्रात राजाराम संताजीस लिहितात-

"...वैशास यांचे (नागोजीचे) पुत्र राजश्री सुभानजी माने त्या प्रांते जमावानसी आहेत. त्यास तुम्ही कित्येक उपेक्षेच्या गोष्टी बोलोन पाने पाठवून देऊन मनास येईल तिकडे जाणे म्हणून सांगोन पाठविले. हे वर्तमान स्वामीस कलो आहे. त्यावरुन स्वामीस आश्चीर्य वाटले की, तुम्ही शाहाणे लोक राज्याचे हित जाणता व करिता यैसे असता पैशा लोकांस पाने पाठवून द्यावी आणि मनास येईल तिकडे जा म्हणावे हे उचित नव्हे व ते जमावहि जैसा तैसा धरित नाही. पोख्तच धरितात. ओवढ्या जमावास त-हा द्यावी हे कोण गोष्ट याउपरी पैसे न करणे. या सुभानजी माने यांचे समाधान बहुता प्रकारे करुन आणू शकत जे

द्यावयाची ते देऊन फौजे समागमे त्यास जमावानसी घेऊन येणे. सर्वथा त्यास दिलगीर होउ न देणे. यावरुन हेच स्पष्ट होते की, संताजीने छत्रपतीच्या आज्ञेची अवहेलना केली होती. यावरुनही त्यांचे व्दैत वाढले असावे.

**३. वतननिष्ठ फितुरांचा गौरव संताजीस नापसंत**

औरंगजेबाकडून फितूर होऊन आलेल्या मराठ्यांचा दबदबा व वरचष्मा मराठी राज्यात नेकीने व इमाने इतबारे सेवा करणा-या मराठी सरदारांपेक्षा वाढला. फितुरांना जे दिले त्याच्या उलट स्वराज्याच्या हितासाठी लढणा-या देशप्रेमी व स्वाभिमानी संताजी घोरपडे यांना एक छोटीशी मिरजेची देशमुखी व धनाजी जाधवास दोन लहान गावे देशसेवेचे चीज म्हणून राजारामाने दिले. त्यामुळे फितुरांबद्दल द्वेष व तिरस्कार देशप्रेमी मराठे सरदारात उत्पन्न झाला. असाच प्रकार औरंगजेबाकडेही घडलेला दिसतो. सुभानजी माने प्रकरण व अमृतरावांशी वर्तनातून हेच सिद्ध होते की स्वामीनिष्ठ मराठे सरदारात फितुरांबद्दल असंतोष धुमसत होता. पण हे वर्तन सर्वस्वी छत्रपतीच्या आदेशांचे उलंघन होते. 6 सप्टेंबर 1691 च्या संताजीच्या पत्रात उल्लेख मिळतो,

"आमच्या राज्यात नवी वृती करुन द्यावी असा दंडक नाही." वरुन कमी जहागिरी देण्याचा प्रकार संताजीस मान्य नव्हता. पण तोच संताजी घोरपडे मसूरचे वतन महादजी जगदाळचे त्याचे त्यास परत करावे म्हणतो." शिवरायांच्या तत्वांचे एकीकडे पालन होत नाही असे म्हणावयाचे तर स्वतः मात्र वतनासाठी इतरांची शिफरस करावयाची हे सोयीचे तत्वच संताजीच पाहात नव्हता काय? त्याच्या पत्रातून छत्रपतीच्या धोरणावरच टिका टिप्पणी नव्हती काय? यामुळेच दोघांत बेबनाव झालेला दिसतो आणि त्यास सर्वस्वी संताजीच जबाबदार होता.

**४. राजारामाचे जुल्फिकारखानाशी धोरण (22 जानेवारी 1693)**

राजाराम व जुल्फिकारखान यांच्यात एक गुप्त करार घडून आला. तो करार औरंगजेबाच्या मृत्युनंतरच अंमलात येणार होता. त्याचाच एक भाग म्हणजे जुल्फिकारखानाने जिंजीवर हल्ला करुन नये, परंतु मोगलांचे जिंजीपुढे उपासमारीने हाल होऊ लागले. करार गुप्त असल्याने बाहेर मराठ्यांना त्याची माहिती नसावी, त्यांनी हल्ले चढविले. जुल्फिकारखानाने राजारामास मोठा नजराना देऊन माघारीस आरंभ केला. यावेळी संताजी-धनाजी यांना असे वाटले की मोठ्या परिश्रमाने जे यश पदरात पडणार होते ते मिळणार नाही. त्यांना जुल्फिकारखान, असदखान व कामबक्ष यांना ओलीस ठेवून घ्यायचे होते. परंतु मोगलांना असे जाऊ दिल्याने संताजीस राग आला. ह्या घटना प्रसंगी धनाजीही संताजी घोरपडे सोबतच होता. कैदेतील येसूबाई व शाहू यांना धोका होण्याची भीती होती. याची जाणीव राजरामास होती. उलट जिंजीपुढून जुल्फिकारखानास जाऊ दिल्यास भावी काळात त्याची आपल्याला मदतच होईल. असेही राजरामास वाटले असावे, यातूनच दुरावा वाढला.

**५. त्रिचनापल्लीच्या नायकाशी तह (23 एप्रिल 1693)**

जिंजीपुढून मोगलांना सहजासहजी जाऊ दिल्याने संताजीचे छत्रपती राजरामाशी बिनसले. तेव्हा त्याचा रुसवा काढून जुल्फिकारखानाशी जे अंतस्थ राजकारण रचले ते समजून सांगावे म्हणून स्वतः राजाराम-संताजी सोबत त्रिचन्नापल्लीच्या मोहिमेवर गेले. राजारामाचा चुलत भाऊ तंजावरचे

दु.शहाजीराजे (व्यंकोजी पुत्र) यांचे व त्रिचन्नापल्लीच्या नायकाचे वितुष्ट होते. यावरुनही ही मोहिम आकारास आली. झालेल्या संघर्षात नायक पराभूत झाला व त्याने राजारामाशी करार केला. त्यास बुडविण्याची संधी मिळूनही सोडल्याने संताजी नाराज झाला. तो जिंजीत परतला. तेथेच नंतर वाद होऊन संताजी घोरपडे महाराष्ट्राकडे परतला. त्यावेळी धनाजीस नंतर विठ्ठल निळकंठ व परशुराम त्रिंबकच्या मध्यस्तीने संताजीची समजूत काढून तो स्वराज्य कार्यास लागला. कासिमखान, खानजादाखान, हिम्मतखानाचा पराभव करुन मोठे विजय मिळविल्यानंतर संताजी जिंजीत दाखल झाले. परंतु संताजीचा तापट स्वभाव राजारामाला भावना नाही. उल्लेख मिळतो की, "तुमच्या हातून पराक्रम होत नाही तर आम्ही दुसरा एखादा लायक इसम पाहून त्यास छत्रपती करु. हे उद्‌गार राजारामासारख्या मितभाषी राजासही सहन न होणारे होते. इंग्रज म्हणतात 'Non-dutiful Behaviour" ते हेच होय. राजारामाचाही संयम ढळला असणार. त्यांचे पत्रच बाकीचे सर्व काही सांगते.

"संताजी यानी स्वामीच्या पायाशी हरामखोरी केली. याकरिता त्यास सेनापती पदाचा कार्यभाग होता तो दूर करुन फौज हुजूर आणविली. "27 ऑक्टोबर 1696 चे हे राजारामाचे पंत रामचंद्र पंथाना लिहिलेले पत्र असून संताजीच्या वर्तनाचा त्यातून अर्थ निघतो. तेच बेशिस्तीचे वर्तन संताजीस मारक ठरले. सेनापती पदावर पुन्हा धनाजी जाधव नेमल्या गेला.

**७. राजारामाचा निपक्षपातीपणा/संताजीचा गैरसमज**

काही इतिहासकारांनी सेनापतीपद संताजी घोरपडेस न देता ते धनाजीस देण्याचा राजारामाचा विचार होता" असे म्हणून राजारामाचा कल धनाजी जाधवकडे असल्याचे म्हणतात. पण यात कसलीच सत्यता नसून डॉ. सेन म्हणतात, "राजाराम महाराज संताजी घोरपडे व धनाजी जाधव मध्ये कधीच भेद करीत नसत किंवा कोणा एकाची बाजू घेत नसत" हेच सत्य होय. जर राजारामास धनाजी जाधवाची बाजू घेऊन सेनापतीपद धनाजीस द्यावयाचे होतेच तर त्यांनी संताजीची वेळोवेळी समजूत घालून स्वराज्य कार्य करुन घेण्याचा संयमीपणा दाखविलाच नसता. मे 1693 मध्ये धनाजीस दिलेले सेनापतीपद परत संताजीस दिले नसते. पण छत्रपतीचा हा निःपक्षपातीपणा जास्त विद्वानांच्या लक्षात येत नाही तसा त्या काळात संताजी घोरपडेच्याही लक्षात आला नाही. अखेर स्थिरबुद्धी राजारामाचा संयम ढळला व त्याने धनाजी जाधवास मे/जून 1696 मध्ये सेनापतीपदावर नेमणूक केलेली दिसते.

**सारांश**

राजारामाशी संताजीचे संबंध पाहाताना हे स्पष्ट होते की शांत स्वभावाच्या राजारामाच्या बाबतीत संताजीचे वर्तन हे ताठरपणाचे होते. त्यामुळे राजाराम-संताजीचे संबंध बिघडत गेले. त्यात राजाराम महाराज यांचाही दोष नाही. ते दोषी असते तर त्यांनी प्रसंगातील कार्यावर खुश होऊन २२ कार्यातीची मिरजेची देशमुखी वंशपरंपरा बहाल केली नसती." याचाच अर्थ राजाराम संताजीच्या बाबतीत फार संयमाने वागत होते. एकंदरीत छत्रपती राजाराम व संताजीच्या संबंधाच्या बाबतीत वितुष्ट दिसून येत असले तरी यात तथ्य नाही हेच म्हणावे लागेल. तसे असते तर पुन्हा संताजीस सेनापती पदावर बसविले नसते.

**संदर्भ :**

१. अ.भा.इ. परिषद अधिवेशन तिसरे, कोल्हापूर, अध्यक्षीय (स.मा. गर्गे) भाषण 22-10-1994
२. पवार ज.भा., सेनापती संताजी घोरपडे,
३. वैद्य सी.व्ही., मध्ययुगीन हिंदू भारताचा इतिहास खंड-३,
४. सरदेसाई जी.एस., आधुनिक भारताचा इतिहास खंड-१,
५. देशमुख विजय, शककर्ते शिवराय, खंड-1
६. मराठ्यांच्या इतिहासाची साधने, संपादक राजवाडे वि.का., खंड-15, लेख-
७. बेंद्रे, वा.सी., मालोजी आणि शहाजी चरित्
८. सरदेसाई जी.एस., मराठ्यांचा नवीन इतिहास, खंड १,
९. रानडे म.गो., मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्ष,
१०. डफ जी.जे., द हिस्ट्री ऑफ द मराठे,
११. पालसोकर आर.डी., शिवाजी द ग्रेट